**साक्षीदार क्रमांक ०१**

सं.फौ.प्र.क्र.६३५/२०२४
महाराष्ट शासन वि गिता
निशाणी क्र. ०९

**फिर्यादी तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी.**
मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव :— साहेबराव मंगलजी राजस,
वय :— ५९ वर्षे, कोमधंदा : सेवानिवृत्त,
राहणार :— संगेकर नगर, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती.

**सरतपासणी करीता सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकिल पी.आर.इंगळे यांच्यामार्फत**

१. दि. ०७.०३.२०२४ मी पोलिस स्टेशन ब्राम्हणवाडा थडी येथे पो.सहा.उप.निरक्षक म्हणुन नेमणुकीस होतो. मी आरोपी गीता बारस्कर हिचे विरूध्द महाराष्ट दारूबंदी कायदा, कलम ६५(ड) अंतर्गत गुन्हा दाखल होणे कामी रिपोर्ट दिला होता. मला अभिलेखावरील रिपोट दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही असुन मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०/सा.क्र.१** देण्यात येते. त्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला होता. मला छापील प्रथम खबरी अहवालाची प्रत दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.११/सा.क्र.१** देण्यात येते. त्यानंतर मी घटनास्थळी जाउन दोन पंचासमक्ष पंचनामा तयार केला. मी घटनास्थळावरून १७ लीटर हातभट्टीची गावठी दारू जप्त केली. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२/सा.क्र.१** देण्यात येते. जप्त मुद्देमालापैकी नमुना काढुन ते रासायनिक प्रयोगशाळा, अमरावती येथे तपासणीकरीता पाठवले. मला आता पत्र दाखविण्यात आले. ते दि.१४.०३.२०२४ रोजीचे आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.१३/सा.क्र.१** देण्यात येते. नमुना नेणेकामी मी ना.पो.कॉ. अंकुश पायघम यांना ड्यटी पास दिला होता. त्याची प्रत अभिलेखावर आहे. त्यास **नि.क्र.१४/सा.क्र.१** देण्यात यते. तपासादरम्यान मी संबंधित साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती आरोपीविरूध्द पुरावा आढळुन

आल्याने मी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखु शकतो. ती न्यायालयात हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज मंजुर असल्याने न्यायालयात हजर नाही.)

सरतपास संपला.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास ॲड. श्री. व्ही.एच.शिरसाठ यांच्यामार्फत</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मी ब्राम्हणवाडा थडी बीटवर कार्यरत असल्यामुळे तेथील लोकांना ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी ब्राम्हणवाडा थडीची रहिवासी असल्याने मी तिला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मजुरीचे काम करते. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या रिपोर्ट मध्ये मी गस्त घालण्यासाठी किती वाजता गेलो हे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा मालकीबाबतचा दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्टमध्ये घटनास्थळाचे पुर्ण वर्णन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कधीही गस्तीसाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने एका पंचनाम्यावर सही करण्यास नकार दिल्यामुळे मी सुडभावनेने तिचे विरूध्द रिपोर्ट दिला. हे म्हणणे खरे नाही की, गुप्त माहितीदारामार्फत मला माहिती मिळाली हे मी खोटे सांगत आहे.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, मी प्रकाश ठाकरे यांना चांगल्या प्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याकरिता मी त्यांची मदत घेतो. साक्षीदार सांगतो इतर पंचांची देखील मदत घेतो. मी पंचांना हजर राहण्यासाठी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष पंचनामा तयार केला नाही. आणि पंचांना घटनास्थळबाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी पंच उपस्थीत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दोषारोपपत्राती फॉम मध्ये परिच्छेद क्र. १० मध्ये डबकीचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मोघम कागदपत्रांच्या आधारे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे बयाण नोंदविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरापीने माझ्या सांगण्याप्रमोण साक्षीदार

म्हणुन सही न केल्याने मी सुडभावनेने रिपोर्ट देउन तिच्याविरूध्द गुन्हा दखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(एच. एस.सोनार)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
न्यायालय क्र ३ चांदुरबाजार

दिनांकः- ११/ ०९/२०२५